# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती.

क्रमांक:संगाबाअवि/८/सी-१२५२/२०१९
दिनांक ०४/ ०७ /२०१९.

प्रति,
अध्यक्ष/सचिव,
आदर्श बहुउद्देशिय शिक्षण
प्रसारक मंडळ, सुलतानपुर,
ता.लोणार, जि. बुलडाणा.

**विषय :-** नवीन फार्मसी महाविद्यालयाच्या प्रथम संलग्निकरणाबाबत... सत्र २०१९-२०

**संदर्भ :-** १. All India Council for Technical Education, New Dilhi यांचे पत्र क्र.westem/2019-20/1-4335309531, दिनांक ३० एप्रिल, २०१९,
२. शासन निर्णय क्र. टीईएम-२०१९/प्र.क्र.१३१/तांशि-४, दिनांक १० जुन, २०१९

महोदय,

उपरोक्त संदर्भांकीत AICTE व महाराष्ट्र शासनाने आपल्या संस्थेला बी.फार्म. (Bachelor of Pharmacy) या अभ्यासक्रमाचे डॉ.आर.एन. लाहोटी इन्स्टिट्युट ऑफ फार्मासुटीकल एज्युकेशन अॅन्ड रिसर्च सेन्टर,सुलतानपुर, ता.लोणार, जि. बुलडाणा येथे नवीन महाविद्यालय शैक्षणिक सत्र २०१९-२० पासून कायम विना अनुदान तत्वावर सुरु करण्यास शासन निर्णयात नमुद असलेल्या अटी व शर्तीच्या अधिन राहून परवानगी दिलेली आहे.

त्याअनुषंगाने नियुक्त करण्यात आलेल्या चौकशी समित्यांचे अहवाल विद्वत परिषदेच्या पक्षात महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा २०१६ मधील कलम १२(७) अंतर्गत स्विकृत केल्यानुसार, स्तंभ क्र.२ मध्ये दर्शविलेल्या संस्थेच्या स्तंभ क्र.३ मध्ये दर्शविलेल्या नविन महाविद्यालयास स्तंभ क्र.४ मध्ये दर्शविलेल्या अभ्यासक्रमाकरीता स्तंभ क्र. ६ मध्ये दर्शविलेल्या कालावधीसाठी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा २०१६ मधील कलम १०८ व ११० मध्ये दर्शविलेल्या तरतुदींचे अधिन राहुन प्रथम संलग्निकरण प्रदान करण्यात येत आहे.

महाविद्यालयात उपरोक्त अभ्यासक्रमास प्रवेश देतांना शासनाने व संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाने निर्धारित केलेल्या नियमांचे पालन करणे संस्थेवर बंधनकारक आहे. मान्य प्रवेशक्षमतेपेक्षा अतिरिक्त विद्यार्थांना प्रवेश देण्यात येऊ नये.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे नियम, विनियम, अध्यादेश, परिनियम, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा २०१६ मधील तरतुदी महाविद्यालयास बंधनकारक राहतील.

नियमानुसार शिक्षकांची तसेच शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची पदे भरणे संस्थेला बंधनकारक आहे.

शासन निर्णय क्र. युजीसी २००३/(३३/०३)/१ विशी-४, दिनांक ०६ एप्रील, २००३ प्रमाणे संस्थेच्या शैक्षणिक शुल्काच्या सुत्रांचे नियमन करणे व शैक्षणिक संस्था विनियम प्राधिकारीणीकडून सर्व अभ्यासक्रमांच्या शुल्काचे प्रमाणिकरण करुन घेणे संस्थेस / महाविद्यालयास बंधनकारक आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांकडून शुल्क आकारण्यापूर्वी शैक्षणिक शुल्काच्या सुत्रांचे प्रमाणिकरण शैक्षणिक संस्था विनियम प्राधिकारीणीकडून मान्य करुन घ्यावे व त्यानुसारच शुल्काची आकारणी करावी.

| अ. क्र. | संस्थेचे नांव व पत्ता | महाविद्यालयाचे नांव व ठिकाण | विद्याशाखा / अभ्यासक्रम | प्रवेश क्षमता | संलग्निकरणाचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. |
| १. | आदर्श बहुउद्देशिय शिक्षण प्रसारक मंडळ, सुलतानपुर, ता.लोणार, जि. बुलडाणा. | डॉ.आर.एन. लाहोटी इन्स्टिट्युट ऑफ फार्मासुटीकल एज्युकेशन अॅन्ड रिसर्च सेन्टर,सुलतानपुर, ता.लोणार, जि. बुलडाणा | बी.फार्मसी | १०० | सत्र २०१९-२० |

आपला विश्वासु,

सहा.कुलसचिव (म.वि.),
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

**प्रतिलीपी माहीतीस्तव :-**
१. सहसंचालक,तंत्रशिक्षण विभाग, तंत्रनिकेतन परिसर, गाडगे नगर, अमरावती.
२.संचालक, परीक्षा व मूल्यामापन मंडळ, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती.

Scanned by CamScanner